# क्विक हीलकडून रुग्णवाहिका भेट

**पुणे :** क्विक हील टेक्नॉलॉजीजचा सीएसआर उपक्रम क्विक हील फाऊंडेशनने 'संगती' या स्वयंसेवी संस्थेला नवी रुग्णवाहिका भेट दिली आहे. महाराष्ट्रातील मोखाडा येथील आदिवासींचा विकास, शिक्षण आणि आरोग्यासाठी 'संगती' ही स्वयंसेवी संस्था काम करते. ही खास रुग्णवाहिका उपलब्ध झाल्यामुळे या भागातील पायाभूत आरोग्य सेवासुविधांमध्ये सुधारणा होतील, दुर्गम भागांमधून रुग्ण आणि डॉक्टरांची वाहतूक करणे सोयीचे होईल, स्थानिक लोकांना सर्वसाधारण तपासण्या,आजारांचे निदान आणि उपचार अशा मूलभूत आरोग्य सुविधा मिळू लागतील. या भागातील रुग्णांवर उपचार करण्यासाठी मूलभूत आरोग्य सुविधा मिळाल्यामुळे डॉक्टरांसाठी देखील ही खूप मोठी मदत ठरणार आहे. ही रुग्णवाहिका मोबाईल क्लिनिक युनिटमध्ये बदलता येते व रुग्णांसाठी स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण निर्माण केले जाऊ शकते. औषधांची साठवणी तसेच सहजसोप्या पद्धतीने वाटप यासाठी देखील ही रुग्णवाहिका उपयुक्त ठरेल, असे कंपनीचे एमडी आणि सीईओ डॉ. कैलाश काटकर यांनी सांगितले.